मालेगाव हरवलेली चार वर्षाची मानसी अवघ्या तासाभरात कुटुंबियांत परतली

दि. १३/०२/२०२०

# हरविलेली चारवर्षाची 'मानसी' अवघ्या तासाभरात कुटुंबियांत परतली

**मालेगाव**
दि. १२ (प्रतिनिधी)



तालुक्यातील डोंगरकिन्ही येथून मालेगावात उपचारासाठी आलेल्या गवई कुटुंबातील चार वर्षांची चिमुकली मानसी अचानक बेपत्ता झाली. शहरात वर्दळीच्या चौकात १२ फेब्रुवारी रोजी दुपारी घडलेल्या या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच चिमुकलीची शोधाशोध सुरु झाली. अवघ्या तासाभरात पोलिसांनी मानसीचा शोध घेवून कुटुंबाच्या स्वाधिन केल्याने गवई दाम्पत्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलले.

अधिक माहितीनुसार डोंगरकिन्ही येथील राजु त्र्यंबक गवई हे पत्नीसोबत दोन मुलींना घेवून मालेगावात दोन वर्षांच्या मुलीच्या उपचारासाठी आले होते. यावेळी लहान मुलीवर उपचार सुरु असताना सोबत असलेली चार वर्षांची मानसी ही मुलगी रुग्णालयातून बाहेर पडली.सदर प्रकार लक्षात येताच उपस्थितांसोबतच गवई दाम्पत्याने शोधाशोध सुरु केली. मुलगी आढळून येत नसल्याने गवई दाम्पत्याने ओक्साबोक्सी रडत सदर प्रकार मालेगाव पोलिसांना सांगीतला. घटनेचे गांभीर्य ओळखत ठाणेदार आधारसिंग सोनोने यांनी कर्मचाऱ्यांना मुलीचा शोध घेण्यासाठी रवाना केले.दरम्यान, रुग्णालयापासून एक ते दीड कि.मी. अंतरावर असलेल्या शेलु रोडवरील वस्ताद लहुजी यांच्या पुतळ्याजवळ पोलीस कर्मचारी बबलु खान व अमोल पाटील यांना चिमुकली रडत असल्याचे दिसून आले. या कर्मचाऱ्यांनी चिमुकलीला घेवून पोलीस स्टेशन गाठून गवई कुटुंबाच्या स्वाधिन केले. पोलिसांच्या या कामगिरीमुळे गवई दाम्पत्याच्या चेहऱ्यांवर पोलिसांप्रती आदरभाव झळकला.या दाम्पत्य पोलिसांचे आभार मानून गावाकडे रवाना झाले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती.मात्र, पोलिसांच्या तत्परतेने चार वर्षांची चिमुकली तासाभरात आईच्या कुशीत पोहचल्याने सर्वांनी सुटकेचा श्वास घेतला.